जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक २२२ दिनांक - २४/०४/२०२४

सायबर पोलीस स्टेशन,पुणे शहर

**सोनिटॅक्स नावाने क्रिप्टोकरन्सी तयार करुन त्यात गुंतवणूक केल्यास गुंतवणूदारांना गुंतवणूकीच्या अनेक पटींनी मोबदला देण्याचे आमिष देवून गुंतवणूकदारांची कोटयावधी रुपयांची फसवणूक केली तसेच दाखल गुन्हयात अटकपुर्व जामीन नामंजूर झाल्यावर परागंदा असलेल्या आरोपीतास अटक केले बाबत.**

चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे नोंद करण्यात आलेला गुरनं ७६१/२०२३ भादवि कलम ४०९,४२० सह महाराष्ट्र ठेविदारांच्या वित्तीय संस्था मधिल हितसंबधाचे संरक्षण अधिनियम सन १९९९ चे कलम ३,४ या गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठांच्या आदेशान्वये सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे वर्ग करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील फिर्यादी व त्याचे नातेवाईक साक्षीदार यांना नमुद आरोपीताने सोनिटॅक्स नावाने क्रिप्टोकरन्सी तयार करुन त्यात गुंतवणूक केल्यास कमीत कमी वार्षिक २० टक्के परतावा देण्याचे व काही वर्षातच गुंतवणुकीच्या अनेक पटीमध्ये परतावा देण्याचे आमिष दाखविल्याने फिर्यादी व इतर साक्षिदार यांनी एकूण १,०९,९०,४२२/- रु.ची गुंतवणूक केल्यावर त्यांना कोणत्याही प्रकारे मोबदला न देता त्यांची फसवणूक केली म्हणून सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील मुख्य आरोपी नामे संतोष पोपट थोरात, रा.खराडी पुणे याने त्यास सदर गुन्हयात अटकपुर्व जामीन मिळणेकरीता केलेल्या विनंती अर्जावर तात्काळ ४३,९६,१६८/- रुपये १० दिवसांचे आत उर्वरीत ६५,९४,२५४/- रुपये भरण्याचे आदेशावर जामीन मंजूर केला होता. परंतू आरोपीताने सदरची रक्कम न भरता मा. उच्च न्यायालयात अटकपुर्व जामीनाकरीता अर्ज केला तो अर्ज मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी नामंजूर केला. सदर दिवसापासून नमुद आरोपी हा त्याची अटक टाळण्याकरीता विविध फोन नंबर, वास्तव्याचे ठिकाण बदलणे, गाडया विक्री करणे अशा प्रकारे लपुन छपून रहात होता. आरोपीताचे प्राप्त माहितीचे तांत्रिक विश्लेषणा वरुन त्याचा ठावठिकाणा काढून सायबर पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मिनल सुपे-पाटील, पोलीस अंमलदार मुंढे, पवार, मरकड असे वाघोली पुणे येथे दि. २२/०४/२०२४ रोजी. रवाना झाले. नमुद पथकाने निरंतर तांत्रिक तपास करुन दि. २३/०४/२०२४ रोजी आरोपीतास रो हाउस नं ४२, गेरा वल्ड ऑफ जॉय, खराडी, पुणे येथून ताब्यात घेवून सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे आणले. आरोपीताचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली असून मा विशेषित न्यायालय सो, जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे यांनी आरोपीतास दि. २९/०४/२०२४ रोजी पर्यत पोलीस कोठडी सुनावली आहे. नमुद आरोपीताकडून सध्या अंगझडतीमध्ये दोन मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले आहेत. तसेच आरोपीताचे घरझडती व ऑफीस झडती घेवून अधिक पुरावा उपलब्ध करण्याची तजविज ठेवली आहे. अशा प्रकारे पुणे सायबर पोलीसांनी फिर्यादी व गुन्हयातील साक्षीदार यांना क्रिप्टोकरन्सी मध्ये गुंतवणूक करुन मोठया नफ्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या आरोपीस अटक करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यात यश मिळविले आहे.

सदरची कारवाई, मा.पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर (गुन्हे,) श्री. विक्रांत देशमुख, मा सहा. पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे,. श्री. आर. एन. राजे, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिनल सुपे-पाटील, सपोफौ संदेश कर्णे, पोलीस अंमलदार संदीप मुंढे, संदीप पवार, दिनेश मरकड, संदीप यादव या पोलीस पथकाने यशस्वी रित्या पार पाडली आहे. तरी **सोनिटॅक्स नावाचे क्रिप्टोकरन्सी मध्ये ज्या-ज्या लोकांनी गुंतवणूक केली आहे. त्यांनी सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे संपर्क साधावा असे आम्ही आवाहन करीत आहोत.**